जा.क्र.        दै. संघर्ष        दि. ७/१२/२०२२

# चार नवीन महिला समुपदेशन केंद्र सुरु करण्यात येणार

**महिला आयोग अध्यक्ष चाकणकर यांची माहिती**



**उस्मानाबाद /प्रतिनिधी- जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक सभागृहात महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.या बैठकीत विविध विषय चर्चा करुन संबंधितांना चाकणकर यांनी सूचना दिल्या.**

या बैठकीत राज्यातील सर्व महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी महिला आयोग आपल्या दारी उपक्रम सुरु केला आहे, बालविवाहावर आळा घालण्यासाठी जिल्हा व पोलिस प्रशासन पूर्ण ताकदीने काम करणार, जल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबत माहिती देणाऱ्यास बक्षीस व नावाची गोपनीयता राखली जाईल,बालविवाह रोखण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावातल्या आशा वर्कर्स यांनी पुढाकार घेऊन याबाबतची माहिती प्रशासनास कळवावी,

महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला समुपदेशन केंद्र बळकट करण्यात येईल. या ठिकाणी चांगली खोली, सौचालय, फर्निचर आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाणार, गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूण हत्तेला रोखण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा. तसेच याबाबत प्रशासनास वेळोवेळी अवगत करावे.,११२ व १०९८ या टोल फ्री क्रमांकावर महिला व विद्यार्थीनींना होणाऱ्या छेडछाडबाबत तक्रार करावी, हरवलेल्या महिला व मुलींसाठी पोलिस प्रशासनाकडून मिसींग सेल सुरु करण्यात आला आहे. याबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक यांचे कौतुक करण्यात आले. कौटुंबिक हिंसाचार, हुंडा बळी अशा समस्या समाजापुढे मोठें आवाहन आहे. या गोष्टी घरात होत असल्यामुळे कायदा व प्रशासन यात हस्तक्षेप करण्यापेक्षा समाजाने स्वत: सुसंस्कारी होणे आवश्यक आहे. पुढे पान ७ वर

## चार नवीन...

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राज पाटील-गलांडे, प्रकल्प संचालक प्रांजल शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एच.निपाणीकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विधीज्ञा वैशाली धावणे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एस.व्ही.अंकुश आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
जिल्हा माहिती कार्यालय,उस्मानाबाद
कक्ष क्र.28, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद-413501
https://twitter.com/dgiprosmanabadhttps://www.facebook.com/dioosmanabad
http://dioosmanabad.blogspot.in/दूरध्वनी-(02472)222744/224944

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वृत्तपत्राचे नाव : दै. पुण्यनगरी, उस्मानाबाद

दि. 2 डिसेंबर 2022

पुण्य नगरी

# कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी समाज सुसंस्कारीत होणे आवश्यक–चाकणकर

पुण्य नगरी। वृत्तसेवा

**उस्मानाबाद** : राज्यातील महिलांना त्यांच्या दारात येऊन न्याय मिळवून देण्यासाठी राज्य महिला आयोग कटीबध्द असून महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी व कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी समाजाने सुसंस्कारीत होणे आवश्यक असल्याचे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केले.

राज्य महिला आयोगाच्या आढावा बैठकीत श्रीमती चाकणकर बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राज पाटील-गलांडे, प्रकल्प संचालक प्रांजल शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एस. व्ही. अंकुश, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी. एच. निपाणीकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विधिज्ञ वैशाली धावणे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना महिला आयोग अध्यक्षा चाकणकर म्हणाल्या, हरवलेल्या मुलींच्या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत मिसींग सेल सुरु करण्यात आला आहे. प्रत्येक गोष्टींचा पाठपुरावा त्या माध्यमातून घेतला जातो. त्यामुळे बेपत्ता झालेल्या मुलींची किंवा महिलांची संख्या या माध्यमांतून सहज मिळवता येणे शक्य आहे.विद्यार्थीनींच्या आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी १०९८ व ११२ हा टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला आहे.

उस्मानाबाद येथे महिला आयोगाची आढावा बैठक



## बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न करा

बालविवाह रोखण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावातल्या आशा वर्कर्स यांनी पुढाकार घेऊन याबाबतची माहिती प्रशासनास कळवावी. महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला समुपदेशन केंद्र बळकट करण्यात येईल. या ठिकाणी चांगली खोली, शौचालय, फर्निचर आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाणार. चांगला समाज निर्माण होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे असल्याचे मत चाकणकर यांनी यावेळी व्यक्त केले.

Smart Osmanabad Edition
Dec 2, 2022 Page No. 03
Powered by : eReleGo.com

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
## जिल्हा माहिती कार्यालय,उस्मानाबाद
कक्ष क्र.28, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद-413501
https://twitter.com/dgiprosmanabad https://www.facebook.com/dioosmanabad
http://dioosmanabad.blogspot.in/ दूरध्वनी-(02472)222744/224944

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वृत्तपत्राचे नाव : दै. संचार, उस्मानाबाद

दि. 2 डिसेंबर 2022

संचार | उस्मानाबाद

# सोनोग्राफी केंद्रांची वारंवार तपासणी करा

- आढावा बैठकीत राज्य महिला आयोग अध्यक्षा चाकणकर यांचे आदेश
- विद्यार्थिनी, महिलांसाठी १०९८ व ११२ हा टोल फ्री क्रमांक सुरू

संचार प्रतिनिधी

**उस्मानाबाद, दि. १** - जिल्ह्यात ८१ अधिकृत सोनोग्राफी केंद्रे कार्यरत आहेत. तिथे कोणत्याही प्रकारची गर्भलिंग निदान चाचणी होणार नाही, याची तपासणी केली जावी. तसेच जर कुठे अशा प्रकारचे प्रकरण आढळले तर तत्काळ त्या सेंटरवर कारवाई करून ते सेंटर सील करण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले.



राज्य महिला आयोगाच्या आढावा बैठकीत चाकणकर बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राज पाटील-गलांडे, प्रकल्प संचालक प्रांजल शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एस. व्ही. अंकुश, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी. एच. निपाणीकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विधिज्ञा वैशाली धावणे आदी उपस्थित होते.

राज्यातील महिलांना त्यांच्या दारात येऊन न्याय मिळवून देण्यासाठी राज्य महिला आयोग कटिबध्द असून महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी व कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी समाजाने सुसंस्कारी होणे आवश्यक आहे. हरवलेल्या मुलींच्या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत मिसींग सेल सुरु करण्यात आला आहे. प्रत्येक गोष्टींचा पाठपुरावा त्या माध्यमातून घेतला जातो. त्यामुळे बेपत्ता झालेल्या मुलींची किंवा महिलांची संख्या या माध्यमांतून सहज मिळवता येणे शक्य आहे, असेही चाकणकर म्हणाल्या.

विद्यार्थिनींच्या आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी १०९८ व ११२ हा टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला आहे. जेव्हा एखाद्या महिलेला आपण असुरक्षित आहोत किंवा कुठेतरी अत्याचार होतोय याची माहिती मिळताच तातडीने या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. अगदी १० ते १५ मिनिटांमध्ये पोलीस यंत्रणा त्या ठिकाणी पोहोचेल व मदत करेल, त्यामुळे हा टोल फ्री क्रमांक सर्व माध्यमांतून प्रसारीत करण्याचे आवाहनही यावेळी चाकणकर यांनी केले.कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी अशा समस्या समाजापुढे मोठे आवाहन आहे. या गोष्टी घरात होत असल्यामुळे कायदा व प्रशासन यात हस्तक्षेप करण्यापेक्षा समाजाने स्वत: सुसंस्कारी होणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासन चांगल्या प्रकारे काम करत आहेत. तसेच यापुढेही चांगल्या कामाची अपेक्षा राज्य महिला आयोगाची आहे, असेही चाकणकर यावेळी म्हणाल्या. बालविवाह रोखण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावातल्या आशा कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन याबाबतची माहिती प्रशासनास कळवावी. तसेच मुली व महिलांच्या वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी महिला समुपदेशन केंद्र बळकट करण्यात येणार आहे. या ठिकाणी चांगली खोली, शौचालय, फर्निचर आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाणार आहे. सुदृढ आणि चांगला समाज निर्माण होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे आहे, असेही चाकणकर यावेळी म्हणाल्या.